पुण्य नगरी
आरोग्यजागर
। उत्तम आरोग्य । उज्ज्वल भविष्य । पुणे, मंगळवार, २३ जून २०१५

# होमिओपॅथ का व्हावे?

प्रत्येकाला आयुष्यात काहीतरी चांगले करावेसे वाटते. ज्यामुळे आपले नावलौकिक होईल, आर्थिक स्थैर्य आणि समृद्धी मिळेल. दहावीचा उंबरठा ओलांडल्यावर अकरावी ते बारावी या दोन वर्षांत तरुण विद्यार्थ्यांमध्ये विचारांचे माहोळ माजलेले असते की, आपण नेमके काय करावे? इंजिनियर, वकील की डॉक्टर. पण इथेच नेमकी द्विधामनस्थिती न ठेवता ठाम निर्णय घ्यावा लागतो. घेतलेला निर्णय बरोबर आहे की नाही याची खात्री करून पाऊल उचलावे लागते. इथे एक छोटीशी गोष्ट सांगावीशी वाटते. काठमांडूला गेलेल्या एका तरुण प्रवाश्याला पशुपतीनाथांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. टेक्सीस्टंड्वर त्याने मंदिराकडे जाण्यासाठी भाडे किती लागेल याची चौकशी केली. ड्रायव्हरने २०० रुपये सांगितल्यावर तो तरुण म्हणाला मी धडधाकट आहे एवढे पैसे वाया घालवण्यापेक्षा मी पायी देखील मंदिरात जाऊ शकतो. तो तरुण पुढे चालू लागला. काही अंतर पोचल्यावर स्वताःजवळच्या सामानाने बराचसा थकला. त्याने फिरून पाहिले आणि टॅक्सीला हात दिला. त्याने विचारले आता निम्मे अंतर आले आहे आता पैसे किती घेणार? टॅक्सीवाला पटकन उद्गारला ४०० रुपये; तो तरुण चपापला त्याने विचारले का? टॅक्सीवाल्याने शांतपणे उत्तर दिले की, तू रस्ता चुकलास? नेमकी हीच स्थिती तरुणांमध्ये होऊ नये याची काळजी प्रत्येकाला घ्यायला पाहिजे. आणि घेतलेला निर्णय तो आपली जबाबदारी समजून, स्वीकारून पुढे चालत राहिले पाहिजे.

डॉक्टर होताना नेमकं काय कराव? हे देखील प्रत्येकाने ठरवलं पाहिजे. भारत सरकारने वैद्यकीय सेवेचे खूप मोठे दालन उभे केले आहे. त्यात होमिओपॅथ, आयुर्वेद, युनानी यांना राजमान्यता देण्यात आली आहे. हे शास्त्र मानवाच्या सेवेसाठी वरदान आहे. परंतु तरीदेखील प्रत्येक शास्त्र परिपूर्ण नाही. तरीदेखील आपण होमिओपॅथीची निवड का करावी? या विषयीची माहिती होण्यासाठी एक छोटीशी मार्गदर्शनपर माहिती. होमिओपॅथ उपचार पद्धतीचा वाढता वेग आणि होमिओपॅथद्वारे ज्या लाखो रुग्णांना रोगमुक्ती मिळाली त्यामुळे होमिओपॅथ रुग्णांची संख्या अतिशय वाढत आहे. आणि होमिओपॅथ डॉक्टर्सची संख्या वेगाने वाढू लागली आहे. त्यात काही शास्त्रशुद्ध होमिओपॅथ डॉक्टरांनी जगभर चमत्कारिक वाटावे असे असाध्य रोग बरे करून वैद्यकीय क्षेत्रात खळबळ माजवली. भयभीत, तणावग्रस्त, रोगग्रस्त, मानवजातीला निर्विवाद साक्षात्कार दाखवला. तेव्हापासून होमिओपॅथविषयी असूया वैद्यकीय क्षेत्रात निर्माण झाली. परिणामी होमिओपॅथचे जनक डॉ. हनेमान यांच्या काळापासून होमिओपॅथवर टीका, आणि द्वेष वाढू लागला. तो आतादेखील दिसून येत आहे.

होमिओपॅथच्या लोकप्रियतेमुळे इतर औषधजन्य कंपनीची धाबे दणाणले. जसजसा होमिओपॅथचा उपयोग समाजाला होऊ लागला तसतशी विविध औषधजन्य कंपन्यांची टक्केवारी घसरू लागली. हा गुप्त तणाव हळू हळू उफाळू लागला. तणाव इतका वाढू लागला की, आयुर्वेद आणि होमिओपॅथमध्ये टीकेचे शीतयुद्ध झाले. आजार बरा करता करता दुष्परिणाम निर्माण करणाऱ्या औषधांचा वापर होऊ लागला. अलोपॅथी जगभर कशी श्रेष्ठ आहे, हे दाखवण्याचा व्यावसायिक प्रयत्न होऊ लागला. मग त्याचबरोबर सर्जन देखील सरसावून पुढे आले. आणि रोगमुक्तीच्या नावाखाली अनावश्यक शस्त्रक्रिया आणि औषधांचा भडीमार होऊन त्याचा परिणाम रुग्णाच्या खिश्यावर आणि शरीरावर होऊन तो अधिकच जीर्ण त्रस्त होऊ लागला. भारतासारख्या विकसनशील देशावर या वैद्यकीय चढाओढीचा परिणाम दिसू लागला आणि सामान्य मध्यमवर्गीय लोकांमध्ये तसेच गरीबांवर आर्थिक बोजा पडू लागला. अशावेळी होमिओपॅथ चिकित्सापद्धती रुग्णांना वरदान ठरली. होमिओपॅथला जनसामान्यांनी डोक्यावर घेतले. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून त्याचा होमिओपॅथचा अभ्यास केला जातो. केस घेताना रुग्णाचा संपूर्ण अभ्यास केला जातो. संवेदना, त्याचा आजार, त्याची मानसिकता जाणून घेता घेता आपोआप रुग्ण आणि डॉक्टरमध्ये जिव्हाळ्याचा आणि स्नेहाचा सेतू तयार होतो. त्यात होमिओपॅथ ही एक आल्हाददायक चिकित्सा पद्धती असल्यामुळे दुग्धशर्करा योग निर्माण होतो. इतर औषधांमध्ये त्यात इंजेक्शन, सलाईनचा भडीमारामुळे रुग्ण त्रस्त होतो. इतर चांगले डॉक्टर्स असून सुद्धा ज्याच्या त्याच्या शास्त्रानुसार एक मजबुरी म्हणून दुष्पपरिणाम निर्माण करणारी कडू, तुरट, पाणचट औषधे नाइलाजास्तव शास्त्राचा मान ठेऊन द्यावी लागतात. होमिओपॅथची तुलना करताना 'लाख दुखोकी एक दवा' असा केला जातो.

होमिओपॅथमध्ये कुठलाही भपकेबाजपणा नाही. इतर चिकित्सा पद्धतींमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या, आकर्षक रंगाच्या, वेगवेगळ्या स्ट्रीप मधल्या आकर्षक गोळ्या दिल्या जातात. इतर ठिकाणी बघायला मिळणारा कन्सल्टिंगमधला भपकेबाजपणा होमिओपॅथमध्ये दिसत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या सजावटीचा , देखाव्याचा खर्च डॉक्टरवर आणि रुग्णावरही पडत नाही.

होमिओपॅथ शास्त्र ही निःशस्त्र आणि अहिंसात्मक चिकित्सापद्धती आहे. डॉ. हनेमान यांनी अतिशय सहज, सोपी उपचार पद्धती सांगितली आहे. इतर चिकित्सा पद्धतीमध्ये लक्षणांनुसार विविध औषधे एकत्रितपणे दिली जातात. त्यामुळे त्याचे दुष्पपरिणाम पेशींवर होऊन खूप असाध्य रोग निर्माण होत आहेत. होमिओपॅथमध्ये संपूर्ण व्यक्तीमत्व बघून एकच औषध रोग्याला देण्यात येते. त्यामुळे औषधजन्य दडपशाही पासून रोगी रोगमुक्त होतो. शास्त्रशुद्ध होमिओपॅथमुळे लहान मुलांमधील प्रतिकार क्षमता वाढवता येते. त्यामुळे सुदृढ नागरिक बनवण्यास होमिओपॅथची मदत होते. गरोदरपणात सुद्धा निर्धोकपणे होमिओपॅथचा वापर करता येतो.

होमिओपॅथमध्ये शरीर व मन या दोहोंचा एकत्रित विचार करून औषधे दिली जातात. त्यामुळे विविध आजार बरे करता येतात.

इतर चिकित्सापद्धतींमध्ये मनुष्याला एखाद्या यंत्राप्रमाणे ठीक केले जाते. यंत्राचा एखादा भाग कमी झाला तर तो दुरुस्त करणे परंतु माणसाचे शरीर म्हणजे खूप महत्त्वाच्या संस्थेचा एकत्रित समूह आहे. जो एका चेतना शक्तीमुळे एकमेकांच्या समन्वयानुसार सुरळीतपणे असतो. त्यामुळे संस्थानुसार होमिओपॅथी डॉक्टर्सचे वर्गीकरण होत नाही.

## होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम

होमिओपॅथीमध्ये रोगापेक्षा रुग्णाला महत्त्व दिले जाते. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून चिकित्सा केल्यामुळे रोग्याचे शरीर व मन, संस्कृती आणि विकृती यांचा एकत्रितपणे अभ्यास केला जातो, म्हणजे नैसर्गिक नियमांचा आधार घेऊन रोगमुक्ती केली जाते. इंजेक्शन, सलाईनच्या वापरानंतर होणारा कचरा, मुदत संपलेली औषधे वगैरे वगैरेमुळे प्रदूषण होते. होमिओपॅथी अद्भूत आहे.

होमिओपॅथी औषधे ही जीवाणू, विषाणू किंवा बुरशीच्या आजारांवर खूप चांगल्या प्रकारे काम करते. उदाः एचआयव्ही, हिपेटायटीस बी. होमिओपॅथी चिकित्सेमुळे आजाराविषयीची भीती दूर व्हायला मदत होते. आणि रुग्ण निर्भिडपणे जीवनाचा आनंद घेऊ शकतो.

होमिओपॅथी औषधांनी शरीरांतर्गत अंतःस्त्रावी ग्रंथीना उत्तेजना मिळते. त्यामुळे अंतःस्त्रावी ग्रंथीचे स्त्राव नैसर्गिकरीत्या स्त्रवले जातात. त्यामुळे शरीर व्याधीमुक्त होते. होमिओपॅथी खूप चांगल्या पद्धतीने काम करते. होमिओपॅथी जलद गतीने उपचार करणारी आहे. दुखापती नंतर होणाऱ्या वेदना, रक्तस्त्राव यांवर देखील फक्त होमिओपॅथी औषधांनी उपचार करता येतात.

**केस :** १. ही एका ६७ वर्षे वयाच्या रुग्णाची केस आहे. ज्याला फुप्फुसांमध्ये कफ जमा होऊन श्वसनसंस्था निकामी होऊ लागली होती. ही एक आणीबाणीची अवस्था आहे. त्यामुळे पेशंटला तत्काळ मृत्यू येऊ शकतो. पेशंटला उच्च ताप, उलट्यांचा त्रास व साधे बोलताना सुद्धा धाप लागत होती. उदरपोकळीत जमा झालेले पाणी तीनवेळा काढून सुद्धा पुन्हा उद्भवले होते. अशा अवस्थेत तो चित्तभ्रमीत झाला होता. संपूर्ण व्यक्तीमत्व लक्षात घेऊन मी त्याला होमिओपॅथी औषध दिले. ५ ते ६ दिवसांत त्याच्या उदरपोकळीतील पाणी कमी होऊन दम लागणे कमी झाले. तो चित्तभ्रमित अवस्थेतून बाहेर आला. दहा दिवसानंतर तो स्वतः हून श्वास घेऊ लागला. त्याची भूक, झोप सुधारली. १५ दिवसांत तो पूर्ववत झाला.

२.Case of Swine Flu :

पुण्यात जेव्हा Swine Flu ची अतिभयंकर साथ आल्यामुळे जनमाणसांत भीती पसरली होती. तेव्हाची ही एक १८ वर्षांच्या Swine Flu झालेल्या मुलाची केस आहे. सतत उच्च प्रमाणात ताप, दम लागणे, सर्दी, खोकला या लक्षणांबरोबरच त्याची Swine Flu H1N1 टेस्ट Positive होती. औषधे देऊनही त्याला फरक वाटत नव्हता. होमिओपॅथी औषधानंतर १-२ दिवसांत त्याच्या सर्व लक्षणांमध्ये फरक दिसून आला. मुख्यतः दम लागणे, ताप येणे कमी झाले. भूक लागू लागली. ७ दिवसांनी पुन्हा H1N1 टेस्ट केल्या ती Negative आली.

३. Case of Pontine Hemorrhage (Brain Haemarrhage)

मेंदूतील रक्तस्त्राव -

ही एका ३८ वर्षे वयाच्या पुरुषाची केस आहे. ज्याला एकाएकी अचानक चक्कर येऊ लागल्या व आकडी येऊ लागली आणि तो बेशुद्ध झाला. अशा अवस्थेत त्याला कुउव मध्ये भरती करून कृत्रिम श्वासोच्छवासावर ठेवण्यात आले होते. Brain Haemorrhage ही अतिशय आणीबाणीची वेळ आहे. डॉक्टारांनी स्पष्ट सांगितले होते की, हा वाचू शकणार नाही. होमिओपॅथी औषध सुरू केल्यानंतर ३ दिवसांनी पेशंटच्या डोळ्यांत व हातात हालचाली होऊ लागल्या. १२ व्या दिवशी त्याचे Ventilator काढण्यात आले. दिवसेंदिवस पेशंटची प्रकृती सुधारू लागली. १ महिन्यानंतर पेशंटच्या हाताच्या हालचाली होऊ लागल्या. तो लोकांना ओळखू लागला आणि पातळ पदार्थांचे सेवन करू लागला.

४. एक १२ वर्षांची मुलगी दुबईतील पोहण्याच्या स्पर्धेनंतर घरी परतत असताना तिला अचानक जास्त प्रमाणात ताप व उलट्यांचा त्रास होऊ लागला. ताप दिवसेंदिवस औषधे घेऊनसुद्धा वाढत जात होता. तिला Dengue असल्याचे निदान झाले. वाढता ताप आणि कमी झालेला Platlete Count यामुळे पेशाने डॉक्टरच असलेले तिचे आई वडील घाबरले. घरातील नातेवाईकांच्या सांगण्यानुसार ते आले. तिची लक्षणे बघून मी तिला औषध सुरू केले व काही तासांसाठी रुग्णालयात भरती केले. तीन तासांतच तिचा ताप उतरला. तिला शांत झोप लागली. उलटी थांबली. तिचा Platlete Count मध्ये वाढ झालेली दिसून आली. ४ ते ५ दिवसांतच ती पूर्ण बरी झाली.

DAMAC

आनंद घ्या

24%

भाडे परताव्याची दुबई मध्ये

हमी*

पुढच्या तीन वर्षात

VISIT US TODAY FOR A MARKETING PRESENTATION
10AM - 10PM
COURTYARD BY MARRIOTT | PUNE CITY CENTRE



निवडक ठिकाणांमधील एखादी अपार्टमेंट किंवा एखादे हॉटेल अपार्टमेंट खरेदी करा व एका तुमच्या योग्य गुंतवणुकीसाठी आणि जे तुम्हाला येतील तीन वर्षात हमखास भाडे परताव्याची हमी देणार आहे अश्या निर्णयासाठी निश्चिंत व्हा.*

+91 12066 19520 | +971 4 301 9999 | DAMACPROPERTIES.COM

*अटी व शर्ती लागू. 17 ते 30 जुन पर्यंतच वैध. Dev No: 192, Dev Name: DAMAC DEVELOPMENT LLC, Project Name, No & Escrow Acc: CELESTIA, 1487, 001-10501820022 NIB PJSC | CONSTELLA-GHALIA, 1505, 16395929 ADIB | VANTAGE, 1499, 16345377 ADIB. Dev No: 954, Dev Name: DAMAC CRESCENT PROPERTIES, Project Name, No & Escrow Acc: LORETO, AKOYA PARK BY DAMAC, 1508, 465511159065, ADIB

